0 8 OCT 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा सोमवारी युवा महोत्सव

## गडहिंग्लजमध्ये घाळी महाविद्यालयातर्फे संयोजन

**गडहिंग्लज, ता. ७ :** शिवाजी विद्यापीठाचा ४२ वा जिल्हास्तरीय युवामहोत्सव सोमवारी (ता. १०) होणार आहे. येथील डॉ. घाळी महाविद्यालयाने त्याचे संयोजन केले असून गडहिंग्लजला प्रथमच विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव होत आहे. यात ७५ महाविद्यालयातील १५०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. बारा कला प्रकारात दिवसभर स्पर्धा रंगणार आहेत. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. सतीश घाळी, प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांनी याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत दिली.

युवा महोत्सवांतर्गत लोककला, लोकनृत्य, वाद्यवृंद, लघुनाटिका, मूकनाट्य, नकला, एकांकिका, पथनाट्य, प्रश्नमंजुषा, वक्तृत्व, सुगमगायन व समूहगायन आदी कलाप्रकार होणार आहेत. घाळी महाविद्यालयाच्या मैदानातील मुख्य रंगमंच, गणेश मंगल कार्यालय, शारदा भवन, कला अकादमी सभागृह, अज्जा-दड्डी कॉलनी मैदान आदी ठिकाणी या स्पर्धा होणार आहेत.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सकाळी दहाला युवा महोत्सवाचे उद्घाटन होईल. विद्या प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा रत्नमाला घाळी अध्यक्षस्थानी असतील. कार्याध्यक्ष डॉ. सतीश घाळी, डॉ. डी. आर. मोरे यांची प्रमुख उपस्थिती आहे. प्रा. ए. बी. उंदरे, डॉ. आर. एस. सावंत, डॉ. नीलेश शेळके, प्रा. शिवाजी पाटील, हरीभाऊ पन्हाळकर, प्रा. महेश कदम यांच्यासह प्राध्यापक व कर्मचारी महोत्सवाचे संयोजन करीत आहेत.

लोकमत

# विद्यापीठ परीक्षांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध ७४७ अभ्यासक्रमांच्या ६०३ परीक्षा एमसीक्यू स्वरूपात घेण्यात आल्या. त्यांतील ५८७ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल गुरुवारपर्यंत ऑनलाईन जाहीर झाले आहेत. दरम्यान, विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या रशियन, जर्मन, जपानी, फ्रेंच, पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या रिक्त जागा भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी प्रवेश अर्ज भरण्याची मुदत १० ऑक्टोबरपर्यंत वाढविली आहे.

लोकमत

# दुरुस्त मतदार यादीवरील सुनावणीची प्रक्रिया पूर्ण

## २५ जणांच्या हरकती : निर्णयाची प्रतीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट), विद्या परिषद या अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी दि. १४ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. त्यासाठीची दुरुस्त मतदार यादी शनिवारी प्रसिद्ध झाली. एकूण २५ जणांनी गुरुवारपर्यंत हरकती नोंदविल्या होत्या. त्यावरील सुनावणीची प्रक्रिंया शुक्रवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या उपस्थितीत पूर्ण झाली. त्यांच्या निर्णयानंतर पुढील कार्यवाही होणार आहे.

दुरुस्त मतदार यादीमध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ३६,३४३ पदवीधर मतदार पात्र ठरले आहेत. दुरुस्त यादीवर कुलगुरूंकडे हरकती, आक्षेप नोंदविण्याची मुदत शनिवारपासून सुरू झाली. त्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत गुरुवारी एकूण २५ हरकतींची नोंद झाली. त्यात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, प्राचार्य, अभ्यास मंडळाच्या यादींमध्ये मतदार म्हणून नावे समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. या हरकतींवर शुक्रवारी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या उपस्थितीत सुनावणी झाली. त्यातील निर्णयानुसार पुढील कार्यवाही केली जाईल. अंतिम मतदार यादी दि. १२ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध होणार असल्याचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सांगितले.

दरम्यान, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम अन्वये ६ व्यवस्थापन प्रतिनिधी, १० महाविद्यालयीन अध्यापक (प्राध्यापक), ३ विद्यापीठ अध्यापक आणि १० नोंदणीकृत पदवीधर अधिसभेवर, तर विद्यापीठ आणि महाविद्यालयीन अध्यापकांमधून ८ व्यक्ती विद्या परिषदेवर, तर प्रत्येक अभ्यास मंडळावर ३ महाविद्यालयीन विभागप्रमुख या जागांसाठी मतदान होणार आहे.

पुढारी

# विद्यापीठ अधिसभा निवडणूक सुनावणी पूर्ण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणूक मतदार यादीबाबत घेण्यात आलेल्या २५ जणांनी हरकतींवर सुनावणी पूर्ण झाली. या निवडणुकीसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ३६ हजार ३४३ मतदार पात्र ठरले आहेत. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या उपस्थितीत सुनावणी पूर्ण झाली. दि. १२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.